# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक २४/०५/२०२१ (सोमवार )

## —: घरफोडी (रात्रीची)—

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील पिपळा डाक बंगला येथील निवासी नितीश दशरथ निमजे वय २९ वर्षे हे आपल्या घरी रात्री बेडरूमचे दार लावुन झोपले असता, बेडरूम चे दाराचे कडी खोलुन बेडरूम मध्ये प्रवेश करून पलंगावर ठेवलेले एमआय नोट ५ प्रो आयएम इ ८६७१९४०३९२२९०६० किंमती १०,००० रू. एमआय नोट ७ प्रो एमआय ८६४१३००४९८४१८८५ किंमती १०,००० रू. असा एकुण २०,००० रू चा माल अज्ञात ईसमानी चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नितीश दशरथ निमजे वय २९ वर्षे रा, पिंपळा डाक बंगला चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. खापरखेडा बोरी येथे कलम ४५७,३८० भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पो हवा उमेश ठाकरे मो.नं ९८२२७६४९९९ हे करीत आहे.

## —: चोरी ( शेती मोटारपंप ) :—

पो.स्टे.मौदा :— अंतर्गत २० किमी अंतरावरील महालगांव शेत शिवारात व्यंकटेश अंकी रेंडी वय ४८ रा महालगाव ता कामठी जि नागपुर यांची शेती असून उन्हाळीत धानाला पानी देण्याकरीत बोर आहे त्या बोर मधे ३ हॉर्सपॉवर सि.आर.आय.४ एफ ५/१८ कंपनीची १०० सम्बर्सीबल मोटार किंमत ७,००० रू असून शेतातला धान कापनी झाली असता त्यांनी बोर कडे जावुन पाहनी केली असता मोटार दिसुन आली नाही. मोटारपंप अज्ञात ईसमांनी चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यंकटेश अंकी रेंडी वय ४८ रा महालगाव ता कामठी जि नागपुर चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. मौदा येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पो. हवा.प्रशांत काळे मो. नं.९८२२५ ४९६९५ हे करीत आहे.

## —: चोरी ( लोखंडी साहीत्य ) :—

**पो.स्टे.खापरखेडा :—** अंतर्गत १५ किमी अंतरावरील सिल्लेवाडा परिसरात अमीत अशोक सतानी वय ४० रा. सिंधी कॉलोनी नागपुर यांची विटा भट्टी असून सदर विटा भट्टीवर ठेवलेले सामान १, लोखंडाचे वॉयबेटर केबल किंमत ३०,०००रू २, ३ लोंखडी स्टुल किंमत १०,०००रू ३, दोन टॉली किंमत १५००० रू ४, रेती उचलण्याची ३ टॉली किंमत ६००० रू चा माल अज्ञात इसमांनी दिनांक २२/०५/२०२१ ते दिनांक २३/०५/२०२१ रात्री दरम्यान चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी अमीत अशोक सतानी वय ४० रा. सिंधी कॉलोनी नागपुर चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. खापरखेडा येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पो हवा उमेश ठाकरे मो.नं ९८२२७६४९९९ हे करीत आहे.

## —: दुखापत व नुकसान करणे :—

**पो.स्टे. नरखेड :—** अंतर्गत १० किमी अंतरावरील मौजा मोवाड येथे राहणारे सुनिल गंगाराम केवटे वय ४५ वर्ष रा.मोवाड,नरखेड यांचे वडीलांनी आपल्या १२ एकर शेती पैकी ३ एकर शेती वडिलाच्या नावावर होती तीचे कोर्टातुन त्यांनी मृत्युपत्र करून दिले होते, उर्वरीत ९ एकर शेती सुनिल गंगाराम केवटे वय ४५ वर्ष रा. मोवाड, नरखेड व यांचे भाऊ १) चंद्रशेखर गंगाराम केवटे, २) संजय गंगाराम केवटे दोन्ही रा.मोवाड,नरखेड या दोघांचे नावावर करून दिलेली होती त्यात त्या दोघांचे साडेचार एकर असे हिस्से होते या वादावरुन नेहमी आपसात भांडण होत होते. दिनांक २३/०५/२०२१ चे १२/०० वा. दरम्यान १) चंद्रशेखर गंगाराम केवटे, २) संजय गंगाराम केवटे यांनी सुनिल गंगाराम केवटे वय ४५ वर्ष रा.मोवाड,नरखेड चे धुरयाला धुरा लागुन संत्राची झाडे जवळ कचरा पेटविले त्यामुळे झाडाला आग लागली व नुकसान झाल्याचे दिसले या कारणावरुन सुनिल गंगाराम केवटे वय ४५ वर्ष रा.मोवाड,नरखेड यांनी १) चंद्रशेखर गंगाराम केवटे, २) संजय गंगाराम केवटे दोन्ही रा.मोवाड,नरखेड यांनी जाब विचारला असता त्यांनी शिवीगाळ करुन दगड मारून खाली पाडुन काठीने मारहाण केले त्यामुळे सुनिल गंगाराम केवटे वय ४५ वर्ष रा.मोवाड, नरखेड डाव्या हाताला जखम झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी सुनिल गंगाराम केवटे वय ४५ वर्ष रा.मोवाड,नरखेड चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी १) चंद्रशेखर गंगाराम केवटे, २) संजय गंगाराम केवटे दोन्ही रा.मोवाड,नरखेड चे विरुध्द पो.स्टे. नरखेड येथे कलम ३२४,४२७,५०४,५०६,३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास नापो निलेश खरडे मो.क्र.९३२५२०३६४७ हे करीत आहे.

## —: जनावरांची सुटका :—

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत २ किमी अंतरावरील गंगापूर फाटा येथे २३/५/२०२१ चे रात्री दरम्यान पोलीस स्टेशन उमरेड चे पथक नाकाबंदी करित असताना, टाटा कंम्पनीचा योध्दा गाडी क्र. एम.एच.३५ ए.जे १९३९ ला थांबवुन त्याची तपासणी केली असता प्रणव हरीचंद्र त्रिरंगे वय २२ वर्ष रा. अर्जुनी बोरगांव जि. भंडारा हा सदर वाहनात अवैधरित्या ०२ काळया रंगाचे म्हशी व काळया रंगाचे ३ हेले एकुण ५ जनावरांना वाहनात निर्दयतेन क्रुरपणे कोबुन त्यांचे तोड व शिंगे पाय दोराने बांधुन एका वर एक असे कोबुन निर्दयतेची वागणुक देत कत्तलीसाठी वाहतुक करून करतांना मिळुन आल्याने जनावरे कि. ७५,००० रू ज वापरलेले टाटा कंपनीचा योध्दा गाडी क्र. एम.एच. ३५ ए जे १९३९ कि. ५,६०,००० असा एकुण ६,३५,००० रू चा माल ताब्यात घेण्यात आले.

सदर प्रकरणी फिर्यादी पोशी प्रकाश गोविदा मुटकुरे बं. नं. ५४० पो. स्टे. उमरेड चे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी प्रणव हरीचंद्र त्रिरंगे वय २२ वर्ष रा. अर्जुनी बोरगांव जि. भंडारा चे विरुध्द पो.स्टे. उमरेड येथे कलम कलम ११ (१) (घ)(ड)(च ) प्राण्याचा छळ सह.५(अ)(ए),९म.प्रा. अधि. सहकलम १८४, १३० मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा किशोर ठाकुर मो. क्र.९०२२८५७६८२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर